PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Suwasini
Year: 1961

Song: Yenar Natha Aata
Lyricist: Ga. Di. Madgulkar

मी पाऊले पहाते
दारात थांबलेली
ये अंगणात छाया आधीच लांबलेली
आता येणार नाथ आता
येणार नाथ आता
आली फुलून गात्रे
ये प्राण लोचनात आ...
आली फुलून गात्रे
ये प्राण लोचनात
सारे मुहूर्त आले
एका खुळ्या मनात
धारेत अमृताच्या
गेला भरून माठ

येणार नाथ आता
येणार नाथ आता

आता नका क्षणांनो
आ...आ...
आता नका क्षणांनो
दोघांत भिंत घालू
स्वर्गा सवे मनात
भूमी वरून चालू
ते प्राणनाथ माझे आता
येणार नाथ आता
येणार नाथ आता

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*